# प्रेसनोट दिनांक ०५/०३/२०१९

## डेक्क्न पोलीस स्टेशन पुणे शहर

दिनांक २८/०२/२०१९ रोजी श्री एस एस मेमाणे सपोफौ, पोना २८८० कापरे, पोशि ८४७३ चिरमे असे रात्रगस्तीस असताना बँक ऑफ इंडिया ए.टी.एम. मशीन प्रतिक हॉटेल जवळ जंगली महाराज रोड पुणे या ठिकाणी ०३/१५ वाजता दोन इसम संशयितरित्या ए.टी.एम.मशिनशी छेडछाड करताना आढळुन आल्याने त्यांना ताब्यात घेवुन नाव पत्ते विचारता त्यांनी आपली नावे (१) वकील नुरदिन खान, वय २२ वर्षे, रा. मु.पो. थुन ता. बिरजनगर, जि. भरतपुर, राज्यस्थान राज्य (२) दिलसाद हारुन खान, वय २५ वर्षे, रा. सदर. अशी सांगितली. त्यांची अंगझडती घेता त्यांच्या कब्ज्यात वेगवेगळ्या बँकेची एकुण १८ ए.टी.एम/डेबीट कार्ड, रोख १६,०००/- रुपये दोन मोबाईल व १ आधार कार्ड मिळुन आले. त्यांचेकडे अधिक तपास करता त्यांनी त्यांचा साथीदार अलीशेर खान रा. रायपुर, भरतपुर, राजस्थान याने एटीएम यंत्रणेमध्ये छेडछाड करुन कसे पैसे काढायचे शिकवुन तो पुढे निघुन गेला. आम्ही दोघांनी सदर ए.टी.एम. मशीन मधुन ॲक्सिस बँकेचे ०३ कार्ड वापरुन कार्ड स्वॅप करुन मशिन मधुन पैसे बाहेर येताच मेन स्विच बंद करुन काढल्याचे सांगितले त्याबाबत रौक रुस्तुमसाहब मणियार वय-४३ वर्षे, रा. १८१, बुध्दविहार जवळ जनवाडी गोखलेनगर पुणे यांनी तक्रार दिल्याने डेक्कन पोलीस ठाणे गु.रजि.नं.६३/२०१९ भा.दं.वि.कलम ४२०,४५१,३८०,१२०(ब),३४ माहीती तत्रंज्ञान कायदा २००० कलम ४३(अ)(ड)(ई), ६६(ड)कलम दाखल करुन आरोपींना अटक करण्यात आली आहे.